महाराष्ट्र शासन

# डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,विष्णूपुरी,नांदेड

दुरध्वनी क्र. ०२४६२-२२९२७७ (प्र.अ.)
फॅक्स क्र.०२४६२-२२९२७५
दु.क्र.०२४६२-२२९२७४ (अधिष्ठाता)
Email Id :- gmcnanded@rediffmail.com

जा.क्र.डॉशंचशावैमविनां/आनि/वरिष्ठ निवासी/जाहीरात/ 1402 /2024 दिनांक: 16 /02/2024

## जाहिरात

**विषयः- डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,विष्णुपूरी, नांदेड येथे मार्च-२०२४ ते ऑगष्ट-२०२४ या सत्रासाठी वरिष्ठ निवासी यांची पदे भरणे बाबत.**

संदर्भ :-१)शासन निर्णय क्र-एलईसी-४३२२/प्र.क्र.२०१/वैसेवा-३ दि.०६ जानेवारी,२०२३.
३)दि.१५.०२.२०२४ रोजीची या कार्यालयाची मंजूर टिप्पणी.

उपरोक्त संदर्भिय विषयास अनसुरुन डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड येथे खालील विवरणपत्रात दर्शविल्या प्रमाणे **मार्च-२०२४ ते ऑगष्ट-२०२४ या सत्रासाठी वरिष्ठ निवासी** यांची रिक्त पदे भरण्याकरिता योग्य त्या अर्हता प्राप्त उमेदवारांकडून अर्ज मागविण्यांत येत आहेत. त्यासाठी खालील पदांसाठी जाहीरात देण्यात येत आहे.

| अ.क्र. | विभागाचे नाव | अ.जा. | अ.ज. | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | वि.मा.प्र | इ.मा.व. | ईडब्ल्यूएस | खुला | एकूण पदे-५० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | औषधवैद्यकशास्त्र | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ |
| २ | त्वचा व गुप्तरोगशास्त्र | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ |
| ३ | मनोविकृत्तीशास्त्र | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०२ |
| ४ | बालरोग चिकीत्साशास्त्र | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ३ |
| ५ | शल्यचिकीत्साशास्त्र | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०२ |
| ६ | अस्थिव्यंगोपचारशास्त्र | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | ०१ | ०० | ०१ | ०३ |
| ७ | क्ष-किरणशास्त्र | ०१ | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०४ |
| ८ | न्यायवैद्यकशास्त्र | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०४ |
| ९ | औषधशास्त्र | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | ०१ | ०३ |
| १० | शरीरक्रियाशास्त्र | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०१ | ०४ |
| ११ | जिवरसायनशास्त्र | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | ०२ | ०४ |
| १२ | सुक्ष्मजीवशास्त्र | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | ०२ | ०४ |
| १३ | शरीररचनाशास्त्र | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०३ | ०६ |
| १४ | इमर्जन्सी मेडीसीन | ०० | ०१ | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०२ | ०१ | ०४ | ०९ |
| | एकूण | ०६ | ०४ | ०१ | ०१ | ०२ | ०१ | ०१ | ०९ | ०५ | २० | ५० |

सदरील पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपातील असून फक्त सहा महिन्याच्या कालावधीसाठी भरण्यात येत आहेत.

**१) वरिष्ठ निवासी पदासाठी आवश्यक शैक्षणिक पात्रता :-**
**खालील प्रमाणे प्राधान्यक्रमानुसार**

१.१) उमेदवारांने भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मान्यताप्राप्त महाविद्यालयातून संबंधित विषयात **पदव्युत्तर पदवी (एमडी/एमएस/डी.एन.बी.)** पास केलेली असावी. संबधित विषयात डी.एन.बी अर्हताधारक उमेदवार असल्यास तो सदर पदासाठी राष्ट्रीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकांची पूर्तता करणारा असावा.

१.२) तसेच त्यांचे **महाराष्ट्र मेडीकल कॉन्सिल** नुसार कायम नोंदणी (**Registration**) असणे आवश्यक आहे.

१.३) सदरील रिक्त पदांवर बंधपत्रीत उमेदवारांचीच निवड करण्यात येईल. बंधपत्रीत उमेदवार उपलब्ध न झाल्यास रिक्त राहीलेल्या पदांवर अबंधपत्रित उमेदवारांचा विचार केला जाईल.

१.४) उमेदवारांचे वय ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

**२) अर्ज मिळण्याचे ठिकाण :-**

आवासी निवासी विभाग, मा.अधिष्ठाता यांचे कार्यालय, डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, विष्णुपूरी, नादेड येथे कार्यालयीन वेळेत मिळतील त्यासाठी रु.२००/- शुल्क भरावा लागेल.

**३) वरिष्ठ निवासी पदासाठीचे अर्ज मिळण्याचा कालावधी :-**

दि.१६.०२.२०२४ ते दि.२२.०२.२०२४ पर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) सकाळी ११.०० ते दु.०१.३० व दुपारी ०२.३० ते सायंकाळी ०५.०० बाजेपर्यंत कार्यालयात मिळतील.

Scanned with OKEN Scanner

४) **वरिष्ठ निवासी पदासाठीचे अर्ज स्विकारण्याची अंतीम तारीख :-**
दि.२२.०२.२०२४ सायंकाळी ०५.३० वाजेपर्यंत या महाविद्यालयाच्या आवासी निवासी विभागात स्विकारण्यात येईल. सायंकाळी.०५.३० वा. च्या नंतर आलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

५) **वरिष्ठ निवासी पदासाठीची मुलाखत दिनांक :-**
५.१)वरिष्ठ निवासी पदासाठीची मुलाखत **दि.२७.०२.२०२४ मंगळवार रोजी सकाळी १२.०० वाजता** या कालावधीमध्ये मा.अधिष्ठाता,डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,विष्णुपूरी नांदेड यांच्या दालनात घेण्यात येईल.
५.२) मुलाखतीसाठी उमेदवारांना वेगळे पत्र पाठविले जाणार नाहीत.
५.३) मुलाखतीच्या वेळी सर्व मूळ प्रमाणपत्रे (Original-Certificates) सादर करणे आवश्यक आहे.
५.४) मुलाखतीस स्वखर्चाने हजर राहावे लागेल त्यासाठी कोणतेही भत्ते अनुज्ञेय राहणार नाहीत.
५.५) मुलाखतीच्या वेळेस उमेदवाराला स्वतः हजर रहावे लागेल उमेदवार अनुपस्थीत असल्यास त्यांच्या ऐवजी कोणत्याही कारणाने उमेदवाराचे नातेवाईक अथवा प्रतिनिधी यांना मुलाखतीस हजर राहता येणार नाही.

६) **वरिष्ठ निवासी पदासाठीचे अटी व शर्ती :-**
६.१) उमेदवाराने अर्जासोबत सर्व कागदपत्रांच्या सांक्षाकींत प्रती जोडणे आवश्यक आहे.
६.२) अर्ज विहीत नमुन्यातच सादर करावा लागेल.अर्ज विहीत नमुन्यात नसल्यास किंवा अर्ज अपूर्ण असल्यास अर्ज स्विकारले जाणार नाही.
६.३)उमेदवार जर सध्या कोणत्याही ठीकाणी सेवेमध्ये कार्यरत असेल तर त्यांनी त्या विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र(NOC) सादर करणे बंधनकारक आहे.
६.४) उमेदवार मागासवर्गीय असल्यास सक्षम अधिकाऱ्याचे जात प्रमाणपत्र,जातवैधता प्रमाणपत्र,तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळून इतर सर्व मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याचे चालू वर्षाचे (Non Creamy layer) प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. तसेच EWS प्रवर्गासाठी शासनाने विहीत केलेल्या नमुन्यात त्या संबंधिचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
६.५) उमेदवाराने कामावर रुजू होते वेळी एक महिन्याच्या मासिक विद्यावेतना एवढी रक्कम अनामत रक्कम (Caution Deposit) म्हणून रोखपाल यांच्याकडे भरणा करावी लागेल. तसेच पावतीची नोंद आवासी निवासी विभागाकडे करावी.अनामत रक्कम भरणा केल्या शिवाय कामावर रुजू करुन घेतले जाणार नाही.
६.६) उमेदवारास जर काही कारणास्तव राजीनामा द्यावा लागत असले तर एक महिना अगोदर पूर्व सूचना(Intimation) विभाग प्रमुखांमार्फत या कार्यालयास सादर करावी लागेल. अन्यथा भरणा केलेली अनामत रक्कम (Caution Deposit) शासनखाती जमा करण्यात येईल.
६.७) वरील सर्व जागा पूर्ण वेळ आहेत.निवड झालेल्या उमेदवाराने २४ तास रुग्णालय परिसरात असणे बंधनकारक राहील. तसेच उमेदवारांनी त्यांच्या राहण्याची सोय स्वतः करणे आवश्यक आहे.
६.८)मार्च-२०२४ ते ऑगष्ट-२०२४ या कालावधीत मा.संचालनालयाकडून बंधपत्रित उमेदवारांची नियुक्ती संबंधित विभागात वरिष्ठ निवासी या पदावर झाल्यास, ज्या अबंधपत्रित उमेदवारांना या महाविद्यालयात तात्पूरत्या स्वरुपात नियूक्ती देण्यात आलेली आहे. अशा उमेदवाराला कूठलीही पूर्व सूचना न देता त्यांची नियुक्ती तात्काळ समाप्त होईल.
६.९)अंतीम निवड झालेल्या उमेदवारांना खाजगी संस्थेत,मंडळ,निमशासकीय कार्यालयामध्ये कोणत्याही प्रकारची नोकरी स्विकारता येणार नाही किंवा खाजगी व्यवसाय करता येणार नाही जर तसे कार्यालयाच्या निदर्शनास आल्यास त्यांची सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.
६.१०)सदर पदांच्या संख्येत बदल करण्याचे/जाहीरात रद्द करण्याचे तसेच सदर पदावर नियुक्ती दिलेल्या उमेदवारांची सेवा समाधानकारक नसल्यास किंवा ईतर कुठल्याही कारणामूळे,दिलेले नियुक्ती आदेश पूर्वसुचने शिवाय समाप्त करण्याचे अधिकार अधिष्ठाता यांनी राखुन ठेवले आहे.

७) **निवड प्रक्रिया :-**
७.१) पदव्युत्तर पदवी/डीएनबी यांच्या गुणाच्या आधारे व सबंधीत विषय उत्तीर्ण होण्यासाठी लागलेले प्रयत्न यांच्या आधारे उमेदवारांची निवड करण्यात येईल.
७.२) **वरिष्ठ निवासी पदासाठी मूळ विद्यावेतन (निव्वळ मानधन) रु.८५००० अनुज्ञेय राहील.**

**अधिष्ठाता,**
**डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,**
**विष्णूपुरी,नांदेड**

**प्रति, सूचना फलक, डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, विष्णुपूरी,नांदेड**
प्रत :- १) मा.आयुक्त(वैद्यकीय शिक्षण),वैद्यकीय शिक्षण व संशोधन,मुंबई यांना माहितीस्तव सादर.
२) संबंधित विभाग प्रमुख, डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,नांदेड
३) सर्व अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य यांना सुचना फलकावर लावण्याकरीता सस्नेह सादर.

Scanned with OKEN Scanner